Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- X | ISSUE- I | JANUARY | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# माध्यमिक स्तरावरील मराठी विषय अध्यापनात पारंपरिक पध्दती आणि संगीत,नाट्यकलेच्या वापराचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास आणि शैक्षणिक संपादणूकीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**संशोधक मार्गदर्शक**
**प्रा.डॉ.हर्षानंद पं.खोब्रागडे**
शासकीय अध्यापक महाविदयालय,बुलडाणा

**संशोधक विदयार्थीनी**
**कु.अंजली अनिल अंजनकर.**

**सारांश**

कोणत्याही विषयाचे शिक्षण असो ते मातृभाषेतूनच व्हावे यावर जगातील बहुतेक शिक्षणतज्ज्ञांचे एकमत झालेले दिसून येते. मातृभाषेतून केलेले अध्ययन विद्यार्थ्यांना सहज समजते. जेव्हा पाहिजे तेव्हा त्याला मिळालेले हे ज्ञान लिहून किंवा बोलून व्यक्त करता येते. नवीन गोष्टींबद्दल त्याआधारे चिंतन करता येते. म्हणून माध्यमाची भाषा या नात्याने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतून मराठीचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे.बालक जेव्हा प्राथमिक शाळेत प्रवेश करते, तेव्हा त्याला मराठी भाषा येत असते हे जरी खरे असले तरी मराठी भाषेशी तसा त्याचा परिचय अल्प प्रमाणात झालेला असतो. भाषेची विविध अंगे, विविध छटा, विविध प्रकारचे सौंदर्य या गोष्टींशी त्याचा परिचय झालेला नसतो. त्याच्या कौटुंबिक वातावरणात तसेच भोवतालच्या परिसरात दैनंदिन व्यवहारापुरती त्या बालकाला भाषा सहजपणे अवगत होते. पण त्याचा स्तर जसजसा उंचावत जाईल. तसतशी भाषेची प्रगल्भता त्याला जाणवली पाहिजे. मराठी विषय हा केवळ प्रश्नोत्तरे लिहिण्याचा विषय नसून भाषा हे संस्काराचे साधन आहे ही जाणीव निर्माण व्हावी. शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये या संस्थांतून मराठी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनी आपला दृष्टिकोन बदलला तर मातृभाषेला अभ्यासक्रमात महत्वाचे स्थान प्राप्त होईल. मातृभाषा हे व्यक्तिगत व सामाजिक विकासाचे समर्थ माध्यम आहे. बालकांच्या व्यक्तिमत्वाचा विकास त्यांच्या मातृभाषेतून होतो. भाषा हे संस्करणाचे प्रभावी साधन आहे. खऱ्या अर्थाने मातृभाषा ही शिक्षणाची गंगोत्री आहे.शिक्षणाचे कार्य गतिमान, प्रभावी, अर्थबोधक आणि मनोरंजक होण्यासाठी दैनंदिन अध्यापन कार्यात अध्यापन पध्दतींचा वापर करणे आवश्यक आहे. ह्या अध्यापन पध्दतींच्या वापराबरोबरच त्या त्या विषयाचा घटक विद्यार्थ्यांना प्रभावीपणे, अचूक आणि सोप्या भाषेत समजणेही तितकेच महत्वाचे आहे. सर्वच अध्यापन पध्दती सर्वच विषयांना सारख्याच पध्दतीने वापरता येत नाहीत. उदा. गणित विषयात कोडी विचारणे, भूगोल विषयात सहल पध्दती वापरणे जसे योग्य ठरेल त्याचप्रमाणे मराठी भाषेचे किंवा विषयाचे ज्ञान मांडतांना आपण जर संगीत, नाट्यकलेची जोड दिली तर विद्यार्थ्यांना मराठी विषय कठीण न वाटता आपल्या जिव्हाळ्याचा वाटेल आणि ते अधिक चांगल्या रीतीने अध्ययन करतील. त्यांचा व्यक्तिमत्व विकास, त्यांच्यातील गुणांना वाव मिळण्यास मदत होईल.

**शोध निबंधाचे शीर्षक :-**

माध्यमिक स्तरावरील मराठी विषय अध्यापनात पारंपरिक पध्दती आणि संगीत, नाट्यकलेच्या वापराचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास आणि शैक्षणिक संपादणूकीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.**शोध निबंधाची उद्दीष्टये :-**

“संशोधन समस्येचे उत्तर शोधण्यासाठी करावयाच्या कार्यपध्दतीला योग्य दिशा देणारे विधान म्हणजे उद्दिष्टये होय.”

१. माध्यमिक स्तरावर मराठी विषयाचे पारंपरिक पध्दतीने अध्यापन करणे.
२. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे अध्यापन नाट्यीकरणाच्या व संगीत कलेच्या माध्यमातून माध्यमातून करणे.
३. माध्यमिक स्तरावरील मराठी विषय अध्यापनात संगीत, नाट्यकलेच्या वापराचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास आणि शैक्षणिक संपादणूकीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**शोध निबंध विषयाची व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे.

१.प्रस्तुत संशोधन हे बुलडाणा जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी माध्यमाच्या शाळेशी संबंधित आहे.
२.प्रस्तुत संशोधन हे इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.
३.प्रस्तुत संशोधन हे मराठी विषयाशी संबंधित आहे.
४.प्रस्तुत संशोधनात मराठी विषयाचे संगीत, नाट्यकलेच्या माध्यमातून अध्यापन करण्यात आले आहे.

**संशोधन पध्दतीची निवड :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.. कारण पारंपरिक पध्दतीपेक्षा संगीत, नाट्यकलेल्या माध्यमातून अध्यापन केल्याने विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व शैक्षणिक संपादणूकीचा अभ्यास केला आहे.

**शोध निबंधाचा न्यादर्श :-**

प्रस्तुत संशोधनासाठी बुलडाणा जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी माध्यमाच्या १०० विदयार्थ्यांची यादृच्छिक पध्दतीने निवड करण्यात आली आहे..

**शोध निबंध संशोधनासाठी निवडलेली साधने :-**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी उपयोगात आणलेल्या पध्दतींच्या परिणामकारतेचा अभ्यास करावयाचा आहे त्यासाठी व्यक्तिमत्वाच्या प्रमाणित चाचण्या वापरण्यात आल्या. तसेच इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी विषयासाठी संपादणूक चाचण्या तयार करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी देण्यात आली.

**शोध निबंधाचे निष्कर्ष व शिफारशी**

१. बहुतेक माध्यमिक स्तरावरील शाळांमध्ये मराठी विषय हा पारंपरिक पध्दतीने शिकविल्या जातो. अभ्यासक्रम हा ठराविक काळात पूर्ण करावयाचा असल्याने मराठी विषय पाठ्यपुस्तकात जसा दिलेला आहे तसाच शिकविला जातो.

२. शालेय स्तरावर व्याख्यान पध्दतीचा अधिक वापर होत असल्याने मराठी विषयाची अभिरूची कमी होते. विद्यार्थ्यांचा बौध्दिक, भावनिक आणि कार्यात्मक विकास साधावयाचा असेल तर मराठी विषय नाविण्यपूर्ण पध्दतीने शिकविण्याची गरज आहे.

३. शिक्षण जर कलेवर आधारीत असेल तर शिक्षण मनोरंजक होईल व शिक्षणातील काही घटकांचा समावेश जर कलाप्रकारांच्या माध्यमाने विद्यार्थ्यांसमोर प्रस्तुत केला तर तो भाग त्यांच्या सदैव स्मरणात राहील.

४.अशाप्रकारे जर शिक्षणात नाटक व संगीत यांचा समावेश केला गेला तर शिक्षण पध्दतीमध्ये सुधारणा होऊन शिक्षण मनोरंजक होईल.

५. यामुळे शिक्षण ओझे न वाटता आनंददायी वाटेल. मराठी विषय जर संगीत, नाट्यकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविला तर ते आनंदाने शिकतील. कठीण, निरस वाटणारा भाग सहज अवगत होईल आणि सदैव स्मरणात राहण्यास मदत होईल. त्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि शैक्षणिक प्रगती सुयोग्य दिशेने होण्यास मदत होईल आणि म्हणूनच ह्या शोधप्रबंध लेखनाची गरज आहे.

६. मानव समाजामध्ये व्यक्तिची अशी रचना जी त्यांच्या जीवनात आनंद, उल्हास निर्माण करते तिला कला म्हटले जाते. कला मानवाची सहज अभिव्यक्ती आहे. कलेला संस्कृतीची संवाहिका मानली जाते. भारतीय संस्कृतीची अनेक रुपे कलारुपानेच प्रदर्शित झाली आहेत.

७. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत आजही मानवाच्या कलेचा विकासक्रम अखंडितपणे सुरू आहे. देशाच्या वातावरणानुसार वा परिस्थितीनुसार कलेमध्ये अनेक परिवर्तने झाली आहेत. कलेमध्ये नवीन जे काही, जेव्हाही आले ते कलेमध्ये मिळून फलरूप झाले. मानवाने चाकाचा शोध, त्यापासून वस्तू तयार करण्यापासून ते पर्वतांना छेदून मंदिरांचे निर्माण केले आहे.

८. कला मानवाच्या विचारांचेच एक दृश्यरूप, प्रतिरूप आहे. कला मानवाच्या विचारांनी प्रेरीत असते. मानवामध्ये ही सृजनशक्ती त्याच्या मानसिक क्रियांमुळे कल्पना, विचार, प्रतिमा इ. मुळे असते. या क्रियाप्रतिक्रियांमुळे नवनवीन गोष्टी जन्माला येतात.

९. सर्जनशीलता हा गुण प्रत्येक मुला-मुलींमध्ये असतो. ही मुले वेगवेगळ्या माध्यमातून ही सृजनशीलता अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करतात. शिक्षणातून व्यक्तिच्या जीवनाला दिशा मिळत असते. पण नाटक, संगीत व कलेल्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे जीवन घडतेच परंतु तो स्वावलंबी बनत जातो. कला प्रकारांच्या विविध माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडून येतो.

१०. संगीत आणि नाट्यकला ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी क्रिया आहे. कला ही जीवनाशी निगडीत असते. मानवाच्या दैनंदिन जीवनातल्या कृतीशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कलेचा संबंध येत असतो.

११. मराठी विषयाचे अध्यापन करतांना त्याला जर संगीत आणि नाट्यकलेची जोड दिली तर अध्ययनकर्ता चांगल्या प्रकारे अध्ययन करू शकेल. विद्यार्थ्यांची आशय आकलन पातळी विकसित होण्यास मदत होईल. त्यांची भाषिक कौशल्ये, मानसिक क्षमतांचा विकास होण्यास मदत होईल. त्यांची मराठी विषयातील अभिरूची वाढून तो विषय विद्यार्थी आनंदाने शिकतील. त्यांची शैक्षणिक प्रगती व व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत होईल. ह्या दृष्टीने प्रस्तुत शोधप्रबंध महत्वाचा आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१.आगलावे प्र.ना. (२०००) "संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे", नागपूर, विद्या प्रकाशन.

२.ओडेयर सुशिला (१९८१), "सामाजिक संशोधन", कोल्हापूर, अजब प्रकाशन.

३.इयत्ता ९ वी व १० वी, "व्यक्तिमत्व विकास हस्तपुस्तिका" (२००५), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक माध्यमिक शिक्षण मंडळ

४.इयत्ता ९ वी चे पाठ्यपुस्तक (२०१७), "स्व-विकास व कलारसास्वाद", पुणे, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ.

५.करंदीकर डॉ. सुरेश (मार्च २००७), "मराठी आशय अध्यापन पध्दती" कोल्हापूर, फडके प्रकाशन पृ.क्र.

६.देशपांडे शैलजा वी. (मार्च २०१८), "शिक्षण समिक्षा: मराठी असे आमुची मायबोली" औरंगाबाद, महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ